# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./२५५ /२०१८ दि. ३०/०७/२०१८

## परिपत्रक

**विषय :- बुधवार, दिनांक १ ऑगस्ट २०१८ रोजीच्या चर्चासत्राचे आयोजनाबाबत.**

संदर्भ :- मा. प्रा. अनिल म. सोले, आमदार, नागपुर(पदवीधर मतदार संघ) तथा अध्यक्ष, फॉर्च्युन फांऊडेशन नागपुर यांचे कार्या. पत्र क्र अ.वि.प.स. २३/३, दिनांक २३/०७/२०१८

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, फॉर्च्यून फांऊडेशन, नागपुर व चाणक्य मंडळ परिवार, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने गडचिरोली येथे बुधवार दिनांक १ ऑगस्ट २०१८ सकाळी ११.०० वाजता व चंद्रपुर येथे दिनांक १ ऑगस्ट २०१८ सांयकाळी ५ वाजता एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले आहे.

१० वी व १२ पास विद्याध्यांनी पुढे काय करायचे ? आर्टस, कॉमर्स, सायन्स, इजिनियरिंग इत्यादी अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना भविष्यात कोणत्या संधी उपलब्ध आहेत ? UPSC, MPSC इत्यादी स्पर्धा परिक्षांची तयारी कशी करायची ? आपल्या भविष्याचा निर्णय करण्यासाठी आपल्या मनाची तयारी कशी असली पाहीजे ? आपले लक्ष्य साध्य करण्याकरीता काय काय करावे लागेल ? असे अनेक प्रश्न आज विद्यार्थी व त्यांच्या पालकांसमोर आहेत.

त्याअनुषंगाने चाणक्य मंडळ परिवाराचे, संचालक माजी सनदी अधिकारी(IAS) श्री. अविनाश धर्माधिकारी आपल्या आयुष्यात आपण कसे यशस्वी होवू शकतो या दृष्टीने मार्गदर्शन करणार आहेत. तरी विद्यार्थी, युवक व पालकानी मोटया संख्येत उपस्थित राहुन या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा या दृष्टीने आपल्यास्तरावर आवश्यक सुचना निर्गमित करण्याची कार्यवाही घ्यावी.

(डॉ. गो. दा. दुबे)
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र - संदर्भीय पत्र संलग्नित.

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, यांना माहितीकरीता अग्रेषीत.
२) मा. प्र-कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीकरीता अग्रेषीत.
३) मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र विधान परिषद

# प्रा. अनिल म. सोले

आमदार, नागपूर (पदवीधर मतदार संघ)
सचिव – भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश

जा. क्र. अ.वि.प.स. 23/3 दिनांक : 23/7/2018

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 3318 दि. 30.7.18
जावक क्र. ........ दि. ........

प्रति,
मा. कुलगुरू
गोंडवाणा विद्यापीठ, गडचिरोली.

महोदय,

फॉर्च्यून फाऊंडेशन नागपूर व चाणक्य मंडळ परिवार पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने **गडचिरोली येथे बुधवार दि. 1 ऑगस्ट 2018 सकाळी 11 वाजता व चंद्रपुर येथे दि. 1 ऑगस्ट 2018 सायंकाळी 5 वाजता** एका चर्चासत्राचे आयोजन करण्यांत आलेले आहे.

10 वी व 12 पास विद्यार्थ्यांनी पुढे काय करायचे ? आर्टस, कॉमर्स, सायन्स, इंजिनियरिंग इत्यादी अभ्यासक्रम करणाऱ्या विद्यार्थ्यांना भविष्यात कोणत्या संधी उपलब्ध आहेत ? UPSC, MPSC इत्यादी स्पर्धा परिक्षांची तयारी कशी करायची ? आपल्या भविष्याचा निर्णय करण्यासाठी आपल्या मनाची तयारी कशी असली पाहिजे ? आपले लक्ष्य साध्य करण्याकरिता काय काय करावे लागेल ? असे अनेक प्रश्न आज विद्यार्थी व त्यांच्या पालकांसमोर आहेत.

मुंबई पुण्यापासून दूर असलेल्या उपरोक्त जिल्हयात या संपूर्ण विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी सुयोग्य व अधिकारी व्यक्तीला विद्यार्थी व पालकांशी संवाद करण्यासाठी आणावे अशी कल्पना माझ्या मनात आली. मी चाणक्य मंडळ परिवारचे संचालक माजी सनदी अधिकारी (IAS) श्री. अविनाश धर्माधिकारी यांच्या जवळ ही कल्पना बोलून दाखविली व श्री अविनाश धर्माधिकारी यांनी त्याला ताबडतोब होकार दिला.

विद्यार्थी, युवक व पालकांच्या दृष्टीने श्री. अविनाश धर्माधिकारी यांचे भाषण ऐकणे ही एक पर्वणीच आहे. आपल्या आयुष्यात आपण कसे यशस्वी होवू शकतो या दृष्टीने श्री. अविनाश धर्माधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.

तरी विद्यार्थी, युवक व पालकांनी मोठया संख्येत उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा या दृष्टीने कृपया आपण आपल्या विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या चंद्रपूर, गडचिरोली येथील महाविद्यालय यांचे मा. प्राचार्य महोदय याना सुचना दयावी, हि विनंती.

धन्यवाद !

स्नेहांकित,
(प्रा.अनिल सोले)

ऑफीस : प्लॉट नं.४, बुटी ले-आऊट, नागपूर – ४४००२२
ईमेल : amsole@rediffmail.com, मो. : ०९८२२५७८४५३ / ०९९२३४९६००३, फॅक्स नं. : ०७१२-२२४५६५९

# फॉर्च्यून फाऊंडेशन
आणि
# चाणक्य मंडल परिवार




यांच्या संयुक विद्यमाने



# दहावी-बारावी नंतर करिअर आणि स्पर्धापरीक्षा

मार्गदर्शक :

**अविनाश धर्माधिकारी**
(Ex IAS)
संस्थापक-संचालक,
**चाणक्य मंडल परिवार**



**अकरावी ते पोस्ट ग्रॅज्युएशन तसेच सर्व क्षेत्रातील विद्यार्थी, पालक वर्गासाठी आयोजित चर्चासत्र**

संकल्पना
**आ.प्रा.अनिल सोले**
अध्यक्ष-फॉर्च्यून फाऊंडेशन

**बुधवार दि. १ ऑगस्ट २०१८ सायंकाळी ५.०० वाजता**

: प्रमुख उपस्थिती :

**स्थळ : प्रियदर्शिनी सभागृह, चंद्रपूर**


आ.रामदासजी आंबटकर


आ.नागो गाणार


आ.नानाभाऊ श्यामकुळे

संयोजक


सुभाष कासनगोट्टूवार

जीवनामध्ये करिअर बनविण्याकरिता विद्यार्थी, युवक व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, हि विनंती.